**वाचले :-**

१. शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-१०७६/१२, दि.२१/०६/१९८२
२. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग अधिसूचना क्र.परिक्षा १४८५/३६२०/४३६/ई-७ दि.१८/०१/१९८८
३. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक १४९१/ प्र.क्र.३३७/ई-७ दि.२०/०७/१९९३
४. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक एसआरव्ही १४९४/प्र.क्र.८६३/(१)/ई-७ दि.२७/०१/१९९६
५. शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्र.एसआरव्ही २१९५/प्र.क्र.८४/ई-७ दि.१७/०२/१९९८
६. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक परिक्षा १२८५/२७७५/प्र.क्र.३३९/(भाग २)/ ई-७ दिनांक ७ जुलै, १९९९
७. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मशा/आस्था-१/अ-८/प्र.क्र.३०/२०११ दि.२४/०४/२०१२
८. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मशा/आस्था-१/अ-८/प्र.क्र.१६/२०१२ दि.१६/११/२०१२
९. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.२८८/२०१३ मध्ये दि.१६/१२/२०१४ रोजी दिलेले आदेश
१०. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मशा/आस्था-१/अ-८(१)/प्र.क्र.०६/२०१५ दि.१९/०३/२०१५
११. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मशा/आस्था-१/अ-८(१)/प्र.क्र.०७/२०१५ दि.१९/०३/२०१५
१२. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मशा/आस्था-१/अ-८(१)/प्र.क्र.१०/२०१५ दि.१९/०५/२०१५
१३. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.३५४/२०१५ मध्ये दि.०२/०२/२०१७ व दि.०३/०२/२०१७ रोजी दिलेले आदेश
१४. कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक १४/०२/२०१७

------------------------------------------*********------------------------------------------

क्र.मशा/आस्था-१/अ-८(१)/ज्ये.या.लिपि./प्र.क्र.१६/१७
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
अलिबाग, दिनांक १५/०२/२०१७

**ज्ञापन**

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्र.२८८/२०१३ च्या अनुषंगाने मा.न्यायाधिकरणाने उपोद्घातातील अ.क्र.९ कडील आदेशान्वये या कार्यालयाकडून उपोद्घातातील अ.क्र.७ व ८ कडील ज्ञापनान्वये प्रसिध्द केलेल्या लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या अनुक्रमे दि.०१/०१/२०११ व दि.०१/०१/२०१२ या अर्हता दिनांकावरच्या सेवा जेष्ठता याद्या रद्द करुन, त्या नियमातील तरतूदीनुसार व उक्त आदेशात दिलेल्या सूचना नुसार पुन:श्च प्रसिध्द करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील **"लिपीक-टंकलेखक"** संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि.०१/०१/२०११ व दि.०१/०१/२०१२ या अर्हता दिनांकावरची सुधारीत अंतिम जेष्ठता यादी उपोद्घातातील अ.क्र.१० व ११ कडील ज्ञापनान्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.१२ कडील ज्ञापनान्वये लिपिक-टंकलेखक संवर्गाची दि.०१/०१/२०१४ या अर्हता दिनांकावरची प्रारुप ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.२८८/२०१३ मध्ये पारीत केलेल्या आदेशानुसार या कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारीत जेष्ठता याद्यांविरुध्द श्री.एम.एम.सप्रे व इतर यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे नव्याने मुळ अर्ज क्र.३५४/२०१५ दाखल केलेला आहे. सदर मुळ अर्जामध्ये मा.न्यायधिकरणाकडील वरिष्ठ खंडपीठाने दि.०२/०२/२०१७ रोजी (दुरस्ती आदेश दि.०३/०२/ २०१७) आदेश पारीत केलेले असून, मूळ अर्ज क्र.२८८/२०१३ मध्ये दिलेले आदेश रद्दबातल ठरवून, उक्त आदेशा नुसार तयार करण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या ज्येष्ठता याद्या देखील रद्द ठरविल्या आहेत.

त्यानुसार उपोद्घातातील अ.क्र.१ ते ६ कडील शासन अधिसूचना व शासन पत्र यामध्ये नमूद तरतूदी नुसार तसेच मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.३५४/२०१५ मध्ये दिलेल्या निर्देशा नुसार या कार्यालयाच्या आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक संवर्गाची दि.०१/०१/२०१४ या अर्हता दिनांकावरील सुधारीत प्रारूप जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व कार्यालय प्रमुख तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील शाखा प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या कार्यालयात/शाखेत काम करीत असलेल्या **"लिपीक-टंकलेखक"** संवर्गातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यां-

च्या (रजेवर/निलंबीत असलेल्यांसह) निदर्शनास सोबतची ताप्तुरती अतिरिक्त जेष्ठता यादी आणून द्यावी. संबंधीत कर्मचाऱ्यांनी जेष्ठता यादी पाहील्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेऊन, ती कार्यालयीन कागदोपत्री ठेवावी व खालीलप्रमाणे प्रमाणपत्र कार्यालयप्रमुख यांनी या कार्यालयाकडे त्वरीत सादर करावे.

"प्रमाणित करण्यात येते की, **"लिपीक-टंकलेखक"** संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि.०१/०१/२०१४ स्थित सुधारीत ताप्तुरती जेष्ठता जेष्ठता यादी या कार्यालयातील/शाखेतील सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांच्या (रजेवर/ निलंबीत असलेल्यांसह) निदर्शनास आणुन देण्यात आली असून, जेष्ठता यादी पाहील्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेवून कार्यालयीन कागदोपत्री ठेवण्यात आलेली आहे."

कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांना विनंती की, त्यांच्या कार्यालयातील/शाखेतील **"लिपीक-टंकलेखक"** संवर्गातील कर्मचाऱ्यांना सोबतच्या जेष्ठता यादीस त्यांचा काही अक्षेप असल्यास त्या अक्षेपासंबधीचे, त्यांचे लेखी निवेदन त्यांच्या आपल्यामार्फत दि.२८/०२/२०१७ पर्यंत या कार्यालयाकडे पोहचतील अशा बेताने सादर करावेत. दि.२८/०२/२०१७ नंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, याची समज त्यांना द्यावी.

कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी त्यांचेकडे आलेल्या कर्मचाऱ्यांचे आक्षेप सादर करताना, संबधीत कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकावरुन अथवा कार्यालयीन कागदपत्रांवरुन तपासून कर्मचाऱ्यांच्या आक्षेप योग्य आहे किंवा कसे ? याबाबत स्पष्ट अभिप्राय नोंदवूनच ते सादर करावेत.

सही XXX
(शीतल तेली-उगले)
जिल्हाधिकारी रायगड

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.
प्रत :- उपविभागीय अधिकारी,पनवेल/अलिबाग/माणगांव/महाड/कर्जत/पेण/रोहा/श्रीवर्धन
प्रत :- उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),मेट्रो सेंटर क्र.१,३ पनवेल/उरण/काळ प्रकल्प माणगांव/रायगड (०)
प्रत :- तहसिलदार पनवेल/कर्जत/खालापूर/उरण/पेण/अलिबाग/मुरुड/रोहा/सुधागड/तळा/माणगांव/महाड/पोलादपूर/म्हसळा/श्रीवर्धन/अधिक्षक माथेरान
प्रत :- शाखा प्रमुख,महसूल शाखा/ सामान्य खाखा/ लेखा शाखा/ पुनर्वसन शाखा/ सं.गां.यो.शाखा/ बि.शे.शो.मो. शाखा/नोंदणी शाखा/ उप चिटणीस शाखा/पुरवठा शाखा/ निवडणूक शाखा/नगरपालिका प्रशासन शाखा/ रो.ह.यो.शाखा/भूसंपादन शाखा/करमणूक कर शाखा/नियोजन शाखा/कुळवहिवाट शाखा/ खनिकर्म शाखा
प्रत :- अध्यक्ष, रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना, रायगड यांस
प्रत :- आदेश संचिका-२०१७

जिल्हाधिकारी रायगड करीता